# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे 'विशेष' विद्यार्थ्यांना व्हीलचेअरचे वाटप

**पुणे । प्रतिनिधी**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) आणि रिचमंड युनिव्हर्सिटी (लंडन) यांनी विशेष मुलांसाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे. या अंतर्गत सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त विद्यार्थ्यांना ते ३१४ व्हिलचेअर, ३१४ कमोड चेअर्स आणि १०० विशेष सुधारित खुर्च्या त्यांनी प्रदान केल्या आहेत. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे सॅबिस्टियन मोनी व मुकुल माधव फाऊंडेशनचे अतुल माने यांच्या हस्ते व्हिलचेअर आणि कमोड चेअर प्रदान करण्यात आल्या.